वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-मंगळवार दि. २३ सप्टैंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# आठ दिवसापासून जिल्ह्यात पावसाचे थैमान

## पालकमंत्री अजितदादा आणि जिल्हाधिकारी जॉन्सन साहेब, जिल्हा वासियांची हेळसांड थांबवा

## बीड शहरात अनेक ठिकाणी पावसाचा धुमाकूळ

## अनेक घरे वाहून गेले, लाखो रूपयांचे नुकसान

पालकमंत्री साहेब तात्काळ नगर पालिका आणि बांधकाम विभागाची बैठक लावा, ज्या ज्या ठिकाणी पाणी आले त्या त्या परिसराचे मोठ मोठ्या नाल्यांची कामे तात्काळ हाती घ्या

Email:- dailydivyawarta@Gmail.com

# दिव्य वार्ता

Email:-editordivyawarta@gmail.com

**पुढील २० वर्षे तरी बीड शहरात कुठे ही पाणी जमा होवू नये याचे तात्काळ नियोजन करा**

# मराठवाड्यातील शेतकऱ्यांसह व्यापारी,सामान्य नागरीक आता रडकुंडीला आले, अशातच जि.प.ची निवडणूक घेणे म्हणजे या लोकांच्या जखमेवर मिठ चोळण्यासारखे होईल



आता प्रत्येक शेतकऱ्यांची वाताहत झालेली आहे, निवडणूकीचे भाषण ऐकायला कोणीच येणार नाही कारण ना शेतात पीक राहिलं, ना घरात अन्न शिल्लक राहिलं, अशातच निवडणूक घेणे म्हणजे **मुर्खपणाच..**

**पालकमंत्री अजितदादा तुम्ही जिल्ह्यात पाहणीसाठी येणार आहात, ग्रामीण सह शहरी भागातही पाहणी करा**

## जसे शेतकऱ्यांना सरसकट मोबदला देणार आहात त्याच प्रमाणे शहरी भागातील नागरीकांचे जे घर वाहून गेले त्यांना ही मदत करणे गरजेचे

**बिंदूसरा नदीचे अजुन खोलीकरण करा, बीड शहरातील वाहनाऱ्या बिंदूसरा नदीमधील असणाऱ्या जुना बाजार ते चांदणी चौका पर्यंत जाणाऱ्या नवीन पुलाचे काम तात्काळ हाती घ्या आणि त्याची उंची वाढवा, या नदी परिसरात असणाऱ्या पुर रेषेतील नागरीकांच्या पुर्नवसनाची व्यवस्था आत्ताच करा भविष्यात मोठी दुर्घटना घडल्यानंतर पुनर्वसनचा काय उपयोग?**

**खासबाग देवी ते मोमीन पुराला जाणाऱ्या रस्त्यावर तात्काळ पुलाच्या कामाला सुरूवात करा**



बीड : पुणे येथे सुरू असलेल्या सलाम महाराष्टं न्युज चॅनलचे मुख्य संपादक मजहर शेख यांनी कश्मकश, दिव्य वार्ता कार्यालयास भेट दिली असता त्यांचा कार्यालयात स्वागत करतांना संपादक मोहंमद अबुबकर, उघड बातम्या न्युज चॅनलचे संपादक समीर शेख, दिव्य वार्ताचे प्रतिनिधी रईस शेख दिसत आहेत.

## स्कॉर्पिओचा भीषण अपघात एकाचा जागीच मृत्यू



बीड, (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यात मागील पंधरा दिवसापासून मुसळधार पाऊस होत असून यामुळे नागरिकाचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. मांजरसुबा येथील शेख समीर पाशू हे सायंकाळी स्कॉर्पिओ मधून गावाकडे जात असताना पावसाचे पाणी रस्त्यावर आल्याने वाहनाचे टायर पाण्यात फिरले यामुळे गाडीवरील ताबा सुटून डिव्हायडरच्या पलीकडे विरुद्ध दिशेने येत असलेल्या ट्रकवरा जाऊन धडकली.या अपघातात मांजरसुंबा येथील तिरंगा हॉटेलच्या मालकाच्या मुलाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना सोमवारी सायंकाळी सात वाजता घडली. बीड तालुक्यातील मांजरसुंबा येथील तिरंगा हॉटेलच्या मालकाचा मुलगा शेख समीर पाशु व सोबत एक मित्र स्कार्पिओ मधून (क्रमांक एम.एच.२३ बी एच १०१०) बीडकडून मांजरसुंब्याकडे जात होता. मात्र स्टेअरिंगवरील ताबा सुटल्याने विरुद्ध दिशेने येणाऱ्या ट्रकवर जाऊन स्कार्पिओ आदळली. या अपघातात शेख समीर याचा जागीच मृत्यू झाला आहे.तर एकाला गंभीर मार असल्याने बीड येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. हा अपघात डोंगरावरील पावसाचे पाणी रस्त्यावर आल्याने झाला अशी माहिती मिळाली असून अपघात झाल्यावर वाहनाच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या,याची माहिती मिळताच ग्रामीण पोलिस ठाण्याचे पो.हा. मोराळे हे घटनास्थळी जाऊन जखमींना उपचारासाठी रुग्णालयात पाठवले व वाहतूक सुरळीत केली. अपघाताची माहिती नातेवाईकांना मिळताच नातवाईकांनी बीड जिल्हा रुग्णालयात गर्दी केली.या अपघातामुळे कुटुंबावर व मांजरसुंबा दुःखाचा डोंगर कोसळला मित्रपरिवारानी हळहळ व्यक्त केली.

## रिपाइं राज्यभर लढा उभारणार, लवकरच मुख्यमंत्र्यांना भेटणार-पप्पू कागदे

### गायरान धारकांचा मोर्चा जिल्हा कचेरीवर धडकला

बीड, (दिव्य न्युज):- कसत असलेल्या गायरान जमीनीची जिल्हाभरातील प्रलंबीत प्रकरणे तात्काळ निकाली काढण्यात यावी, भूमीहिन गायरान धारक, शेतमजूर, ऊसतोड कामगारांना प्रतिमहा ३ हजार रूपये मानधन देण्यात यावे आणि गायरान धारकांच्या सातबारा व ८ अ उतारा क्षेत्रावर असणारे पोटखराब क्षेत्र काढण्यात यावे या मागणीसाठी रिपाइंचे युवक प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली हजारो गायरानधारकांनी आज दुपारी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून धरणे आंदोलन केले. रिपाइं गायरान धारकांच्या हक्कासाठी राज्यभर लढा उभारणार असून यासंदर्भात केंद्रीयमंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली लवकरच शिष्टमंडळ मुख्यमंत्री, महसुलमंत्री यांना भेटणार असल्याचे पप्पू कागदे यांनी सांगितले. रिपाइंचे युवक प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून जिल्हाधिकारी कार्यालयावर गायरान धारकांचा मोर्चा काढला. त्याठिकाणी धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनावर पप्पू कागदे यांच्यासह राजु जोगदंड, मझर



खान, किसन तांगडे, अशोक साळवे, किशोर कांडेकर, अविनाश जावळे, दिपक कांबळे, महादेव उजगरे, धोंडीराम शिरसट, मायाताई मिसळे, दशरथ सोनवणे, राणी गायकवाड, दिपक कांबळे, बापू पवार, शाहू डोळस, संदीपान डोंगरे, राहूल वाघमारे, अरूण निकाळजे, लक्ष्मण शिरसट, गोवर्धन वाघमारे, राहूल सखरे, महेश आठवले, अविनाश जोगदंड, प्रभाकर चांदणे, विलास जोगदंड, नागेश दुबळे, भैय्या मस्के, संभाजी गायकवाड, भैय्या साळवे, शाम वीर, बंडू ठोंबरे, विशाल गव्हाणे, बाजीराव वाघमारे, रामेश्वर खळगे, देवानंद वाघमारे, राजाभाऊ वखरे, रतन वडमारे, नामदेव वाघमारे, भास्कर जावळे, राजाभाऊ वखरे, अशोक दळवी, धर्मराज खंकाळ, गौतम कोरडे, भाऊसाहेब दळवी आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

दिव्य वार्ता
मंगळवार दि.२३ सप्टेंबर २०२५

रविवारी मध्यरात्री छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड आणि धाराशिव या जिल्ह्यांवर जणू आभाळच फाटले. त्यामुळे सिंदफणा, तेरणा, सीना, कुंडलिकासह अन्य नद्यांना महापूर आला. अनेक गावांमध्ये, शेतांमध्ये पाणी शिरले. उरल्यासुरल्या पिकांसोबत शेतकऱ्यांची स्वप्ने उद्ध्वस्त झाली.

# घरात, शेतात अन् डोळ्यांत पाणी

## सिंदफणा नदीला महापूर आल्याने शिरूरमध्ये हाहाकार



रविवारी रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे सिंदफणा नदीचे पाणी शिरूर शहरात शिरले. त्यामुळे शेकडो घरांमधील संसारोपयोगी साहित्याचे नुकसान झाले.




पावसामुळे बीड जिल्ह्यात कुक्कडगाव येथील पुलावरून पाणी गेल्याने वाहतूक ठप्प झाली.




आष्टी तालुक्यात अतिवृष्टीमुळे पिके उद्ध्वस्त झाल्याने शेतकरी महिलेला अश्रू अनावर झाले.




सिल्लोडला शेतशिवारासह अनेक रस्त्यांना नदीचे स्वरूप आले. रात्री उशिरापर्यंत पूरस्थिती होती.




सिल्लोड तालुक्यातील शेखपूर, पिंपळगाव घाट, मुर्डेश्वर, केळगाव परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतात मोठ्या प्रमाणात पाणी शिरल्याने पिके उद्ध्वस्त झाली.

## वाघूर नदी परिसरात ढगफुटीसदृश पाऊस झाल्याने सप्तकुंड धबधबा यंदा पहिल्यांदाच असा ओसंडला



रविवारी रात्री फर्दापूरसह परिसरात मुसळधार पाऊस झाल्याने वाघूर नदीला पूर आला. त्यामुळे गेल्या आठवडाभरापासून खळाळणाऱ्या सप्तकुंड धबधब्याने प्रथमच असे रौद्ररूप धारण केले.




बीडमधील धांडेनगर परिसरात दुकानांच्या तळमजल्यात पाणी शिरले.




संभाजीनगर जिल्ह्यात पाचोड येथे गल्हाटी नदीला पूर आल्याने गावाचा संपर्क तुटला होता. पाणी ओसरल्यावर वाहतूक सुरळीत झाली.




बीड शहरातील सखल भागात दुकानांमध्ये पाणी शिरल्याने नुकसान झाले.




बीड येथे नागरिकांना वाचवताना पथक.







धाराशिव जिल्ह्यात परंडा तालुक्यातील शेळगावात खैरी नदीला पूर आल्यामुळे पाणी शिरले. परिसरातील १६ गावांमध्ये पुरामुळे शेतीसह घरांचेही प्रचंड नुकसान झाले आहे.




उंडणगावात पाण्यातून दूध नेताना शेतकरी

